मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# उद्योगनगरीत ढोल-ताशांचा गजर, डीजेच्या दणदणाटासह गणेश विसर्जन मिरवणूक जल्लोषात संपन्न

**ढोल-ताशांचा गजर, डीजेचा दणदणाट, आकर्षक विद्युत रोषणाई, : फुलांनी सजवलेले रथ, गणपती बाप्पा मोरयाच्या अखंड जयघोषात मिरवणुका संपन्न**

**पिंपरी | प्रतिनिधी**

ढोल-ताशांचा गजर, डीजेचा दणदणाट, आकर्षक विद्युत रोषणाई, फुलांनी सजवलेले रथ, गणपती बाप्पा मोरयाच्या अखंड जयघोषात पिंपरी-चिंचवडमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक मोठ्या जल्लोषात संपन्न झाली. दुपारी चार वाजता मिरवणुकीला सुरूवात झाली. शहरातील विविध भागात सकाळी सुरू झालेल्या ह्या मिरवणुका रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या. यावेळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील शगुन चौक, चिंचवडमधील चापेकर चौकात स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, उपायुक्त स्वप्ना गोरे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, उपायुक्त अण्णा बोदडे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्या हस्ते गणेश मंडळांचे स्वागत करण्यात येत होते. पिंपरी गाव येथील मित्र सहकार्य तरुण मंडळाच्या नवसाचा महागणपतीची विसर्जन मिरवणूक दुपारी बारा वाजता सुरू झाली. यावेळी प्रभू श्री राम यांची मूर्ती असलेला रथ सर्वांचेच लक्ष वेधत होता. या मिरवणुकीत मातृभूमी ढोल ताशा पथकाने नागरिकांची मने जिंकली.

चिंचवड आनंदनगर येथील गिरीजात मित्र मंडळाची विसर्जन मिरवणूक दुपारी चार वाजता विसर्जन घाटाकडे रवाना झाली. त्यानंतर आठच्या सुमारास आनंदनगर मित्र मंडळाची विसर्जन मिरवणूक चौकात दाखल झाली. त्यांनी कोल्हापूरच्या अंबाबाईचा रथ साकारला होता. बालवारकरी, संबळवादक सहभागी झाले होते. श्री संत ज्ञानेश्वर मित्र मंडळाच्या मिरवणुकीत आरंभ ढोल ताशा पथक , बालवारकरी सहभागी झाले होते. विठ्ठलाचा रथ साकारला होता. तरुण मित्र मंडळाने भंडाऱ्याची उधळण करत पालखीतून मिरवणूक काढली. गांधी पेठ तालीम मित्र मंडळाच्या मिरवणुकीत शिवदर्शन ढोल ताशा पथक सहभागी झाले होते. श्रीराम मोरया दरबार देखाव्याचा चित्ररथ साकारला होता. मुंजोबा मित्र मंडळाने शिवपार्वती रथ साकारला होता. काळभैरवनाथ मित्र मंडळाने 'रामरथ' साकारला आहे. 'पवनामाई आमची माता, आम्हीच तिचे रक्षणकर्ता' असे मजकूर असलेला फलक लावता नदी संवर्धनाचा संदेश दिला. गजाक्ष ढोल ताशा पथक सहभागी झाले होते. ज्ञाप्रबोधिनीच्या १५० मुलांच्या ढोल ताशा पथकाने उत्कृष्ट सादरीकरण केले.

---

## वाकडच्या फिनिक्स मॉल बाहेर हवेत गोळीबार, सीसीटीव्हीमध्ये व्हिडिओ कैद

**वाकड येथील मॉलच्या बाहेरील रस्त्यावर अज्ञाताने हवेत गोळीबार केल्याची घटना घडली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वात मोठा मॉल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाकड येथील फिनिक्स मॉलच्या बाहेरील रस्त्यावर अज्ञाताने हवेत गोळीबार केल्याची घटना घडली आहे. गोळीबार करून संबंधित व्यक्ती पळून गेली आहे. गोळीबार झाल्याबाबत एका व्यक्तीने पोलीस नियंत्रण कक्षाला फोनद्वारे ही माहिती दिली असून, गोळीबार झाला किंवा नाही तसेच कोणी केला याबाबत पिंपरी-चिंचवड पोलीस तपास करीत आहे. मंगळवारी (ता. १६) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. पिंपरी चिंचवड मध्ये नुकतीच एका माजी नगरसेवकाकडून गोळीबार झाल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच आता आणखी एक घटना समोर आली आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी वाकड येथील फिनिक्स मॉलच्या समोर एका व्यक्तीकडून हवेत गोळीबार करण्यात आला आहे. त्याचा सीसीटीव्ही मध्ये व्हिडिओ देखील कैद झाला असून तो वायरल होत आहे. यामध्ये संबंधित व्यक्ती पिस्तूल काढून मॉलच्या दिशेने हवेत गोळीबार करून पळ काढते. वाकड पोलिसांनी गोळीबार करणाऱ्याला पडकले आहे.



---

## यंदाच्या पितृपंधरवड्यावर चंद्र आणि सूर्यग्रहणाचं सावट; या पद्धतीनं करावं श्राद्ध, तर्पण

**यंदाचा पितृपंधरवडा खास असेल, कारण पंधरवड्याची सुरूवात चंद्रग्रहणाने तर शेवट सूर्यग्रहणाने होईल.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदू धर्मात पितृपंधरवड्याला विशेष महत्त्व आहे. या कालावधीत पितरांचं स्मरण केलं जातं. यासाठी तर्पण, दानधर्मासारखे विधी केले जातात. यंदाचा पितृपंधरवडा खास असेल. कारण पंधरवड्याची सुरुवात चंद्रग्रहणाने तर शेवट सूर्यग्रहणाने होईल. त्यामुळे या दिवशी श्राद्धकर्म कसं करावं याबाबत जाणकारांनी मार्गदर्शन केलं आहे. पितृपंधरवड्यात पूर्वज, पितर पितृलोकातून मृत्युलोकात येतात, असं म्हटलं जातं. या वेळी पितरांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या आत्म्याला शांती लाभावी यासाठी श्राद्ध, तर्पण, पिंडदान केलं जातं. भाद्रपद पौर्णिमेपासून पितृपंधरवडा सुरू होतो आणि भाद्रपद अमावास्येला समाप्त होतो. अमावास्येला पितर पितृलोकात परत जातात. त्यामुळे या अमावास्येला पितृमोक्ष अमावास्या, सर्वपित्री अमावास्या किंवा महालया असं म्हटलं जातं. यंदा 18 सप्टेंबरपासून पितृपंधरवडा सुरू होत असून, तो 2 ऑक्टोबरला संपेल. पितृपक्षाची सुरुवात आणि समाप्ती अशा दोन्ही दिवशी ग्रहण असेल. हिंदू धर्मात ग्रहण शुभ मानलं जात नाही. सूर्य आणि चंद्रग्रहणात कोणतंही शुभकार्य, पूजा-विधी केला जात नाही. ज्योतिषाचार्यांच्या मते, एकाच पंधरवड्यात चंद्र आणि सूर्यग्रहण असणं शुभ नसतं. या



कालावधीत सावधगिरी बाळगावी. पितृपक्षावर ग्रहणाचं सावट शुभ मानलं जात नाही. पितृपक्षाची सुरुवात चंद्रग्रहणाने होत आहे. 18 सप्टेंबरला प्रथम श्राद्धाला चंद्रग्रहण आहे. हे वर्षातलं दुसरं आणि शेवटचं चंद्रग्रहण असेल. भारतीय वेळेनुसार सकाळी सहा वाजून बारा मिनिटांनी चंद्र ग्रहण सुरू होईल आणि सकाळी दहा वाजून 17 मिनिटांनी संपेल. हे ग्रहण भारतात दिसणार नसल्याने सुतक पाळण्याची गरज नाही. पहिल्या दिवसाचं श्राद्ध ग्रहणाचा मोक्ष कालावधी संपल्यावर करावं. पितृपंधरवड्याची समाप्तीदेखील ग्रहणाने होत आहे. दोन ऑक्टोबर रोजी पंधरवड्यातल्या शेवटच्या श्राद्धाच्या दिवशी सूर्यग्रहण लागणार आहे. सर्वपित्री अमावास्येला सूर्यग्रहण असणं शुभ मानलं जात नाही. कारण या दिवशी पितरांना निरोप दिला जातो. भारतीय प्रमाणवेळेनुसार, दोन ऑक्टोबरला रात्री नऊ वाजून तेरा मिनिटांनी ग्रहण सुरू होणार असून, मध्यरात्री तीन वाजून 17 मिनिटांनी ग्रहण समाप्त होईल. हे ग्रहण भारतात दिसणार नाही. त्यामुळे ग्रहणाचा सुतक काळ पाळायची गरज नाही. अमावास्येला पितरांना निरोप देण्यासाठी केलं जाणारे श्राद्ध, तर्पण किंवा अनुष्ठानात या ग्रहणामुळे व्यत्यय येणार नाही.

# पुण्यात विसर्जन मिरवणुकीत राडा, पोलिसांकडून बळाचा वापर

**पुण्यातील इतर मिरवणुकीत साऊंड सिस्टीम सुरु करण्यात आल्या, टिळक रोडवरील सिस्टीम बंद होती, यामुळे मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते संतप्त झाले.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील विसर्जन मिरवणुकीला 24 तास झाले आहेत. त्यानंतरही अजून ही मिरवणूक सुरुच आहे. बुधवारी सकाळी दहा वाजेपर्यंत 116 गणेश मंडळाचे विसर्जन झाले आहे. तर दुपारी 1 पर्यंत 171 मंडळे अलका चौकातून पुढे गेलेत. विसर्जन मिरवणूक संपण्यास अजून दोन ते तीन तास लागण्याची शक्यता आहे. मंगळवारी सकाळी 10 वाजून 20 मिनिटांनी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस हार घालून विसर्जन मिरवणुकीला सुरुवात झाली होती. टिळक रोड, कुमठेकर रोड, लक्ष्मी रोड, केळकर रोड या मार्गावरून अजूनही मिरवणूक सुरू आहे. मिरवणूक शांततेत सुरु आहे. परंतु अलका चौक आणि टिळक रस्त्यावर पोलीस आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. भिवंडीत मूर्तीवर दगडफेक झाल्यामुळे तणाव निर्माण झाला.

देशासह राज्यभरातील गणेश भक्तांनी लाडक्या गणपती बाप्पाला जड अंत:करणाने निरोप दिला. पुण्यातील विसर्जन मिरवणुका कोणत्याही विघ्नाविना शांततेत पार पडल्या. मंगळवारी सुरू झालेल्या मिरवणुका आज दुपारी तीन वाजता संपल्या आहेत. पुणे पोलिसांकडून मिरवणूक संपल्या असं जाहीर करण्यात आलं आहे. तब्बल 28 तास पुण्यातील विसर्जन मिरवणुका सुरू होत्या. पुणे पोलीस आयुक्तांनी मिरवणुका संपल्यावर बोलताना काही मंडळांवर कारवाई होणार असल्याची माहिती दिली आहे. नेमकी कोणती मंडळे आहेत आणि त्यांच्यावर का कारवाई होणार जाणून घ्या.

पुण्यातील गणपती विसर्जन मिरवणुका 28 तास मिरवणूक सुरू होत्या. पुण्यामध्ये 8 हजार अधिकारी कर्मचारी बंदोबस्तात तैनात होते. शांततेत गणेशोत्सव पार पडला त्याबद्दल सर्व मंडळ आणि भक्तांना धन्यवाद. यंदाच्या वर्षी मिरणुकांमध्ये लेजरवर पूर्ण पणे बंदी होती. त्यासोबतच आवज मर्यादे संदर्भात देखील डेसीबील मोजण्याच्या मशीन होत्या. ज्या ठिकाणा या नियमांचे उल्लंघन केले गेले त्या ठिकाणी कारवाई करणार असल्याचं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी म्हटलं आहे.

मोबाईल चोरी घटना घडल्या आहेत कमी घडल्या त्या सर्व बाबत कारवाई करून चोऱ्या उघडकीस आणू ,महिला सुरक्षा बाबत काम केलं त्यात काही घटना घडल्या असतील तर त्यावर ही कारवाई करणार असल्याचं अमितेश कुमार यांनी सांगितलं



### टिळक रस्त्यावर साऊंड सिस्टीमवरुन वाद

» टिळक रस्त्यावर साऊंड सिस्टिमवरुन वाद झाला. गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत रात्री बारा ते सकाळी सहा वाजेपर्यंत साऊंड सिस्टिम बंद ठेवली होती. परंतु त्यानंतर सकाळी सहा वाजता पोलिसांनी साऊंड सिस्टीम सुरु करु दिली नाही. पुण्यातील इतर मार्गाने जाणाऱ्या मिरवणुकीत मात्र साऊंड सिस्टीम सुरु करण्यात आल्या होत्या. यामुळे मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते संतप्त झाले. त्यांनी पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यासच्या मंडपासमोरच ठिय्या आंदोलन केले. अखेर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधून साऊंड सिस्टिमवर गणपतीची आरती लावण्यात आली. त्यानंतर मिरवणूकला पुन्हा जल्लोषात सुरुवात झाली.

### अलका चौकात तणाव

» पुण्यात विसर्जन मिरवणुकीत कार्यकर्ते अन् पोलिसांची बाचाबाची झाल्यानंतर पोलिसांकडून बळाचा वापर करण्यात आला. गणेश मंडळाचे कार्यकर्ते ऐकत नसल्यामुळे पोलिसांकडून बळाचा वापर झाला. अलका चौकात एक सार्वजनिक गणेश मंडळ एका जागी थांबून डीजे वाजवत होते. त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या मंडळाची मोठी कोंडी झाली. त्या मंडळास पोलिसांनी वारंवार सांगून देखील कार्यकर्ते मंडळाची मूर्ती पुढे नेत नव्हते. यामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांवर पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. या ठिकाणी काही वेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर पुणे पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याठिकाणी येत वाद थांबावत त्या गणेश मंडळाला पुढे सरकवले.

### भिवंडीत मूर्तीवर दगडफेक

» भिवंडीतील घुंघटनगर येथे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची गणेशमूर्ती विसर्जनासाठी कामवारी नदीकडे रात्री 1 वाजता जात असताना मूर्तीवर दगडफेक झाली. या घटनेत गणेशाच्या मोठ्या मूर्ती खंडीत झाली. यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. तणाव वाढल्याने जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीमार करावा लागला. जोपर्यंत दगडफेक करणाऱ्यांना पकडत नाहीत, तोपर्यंत मूर्तीचे विसर्जन केले जाणार नाही, अशी भूमिका मंडळाच्या कार्यकर्त्यांनी घेतली.

# 'विघ्नहर्ता न्यास'च्या वैद्यकीस सेवेचा 582 नागरिकांना लाभ

**गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान पुणे पोलसांच्या 'विघ्नहर्ता न्यास'च्या वतीने देण्यात आलेल्या वैद्यकीय सेवेचा नागरिकांना लाभ झाला.**

**पुणे | प्रतिनिधी**

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान पुणे पोलसांच्या 'विघ्नहर्ता न्यास'च्या वतीने देण्यात आलेल्या वैद्यकीय सेवेचा ५८२ नागरिकांना लाभ झाला. गर्दी आणि उन्हामुळे नागरिकांना त्रास झाला असून मंगळवारी विसर्जन मिरवणूक सुरू झाल्यानंतर चार तासांमध्येच १२२ जणांवर उपचार करण्यात आले होते.

उन्हाचा तडाखा आणि अति घामामुळे अंगातील पाणी कमी होऊन चक्कर येणे, गर्दीमुळे श्वास गुदमरणे, ढोल-ताशा पथकाने रंगीत धूर सोडणाऱ्या केलेल्या फटाक्याच्या फवाऱ्यातून बाहेर पडणाऱ्या रंगीत धुरामुळे होणारा दमा आणि खोकल्याच्या प्रमाणात वाढ, ट्रॅक्टर किंवा ट्रॉलीच्या पत्र्यामुळे होणाऱ्या जखमा ढोल-ताशा वाजवणाऱ्या युवक-युवतींना डोक्यामध्ये टिपरू लागून होणारी जखम यांसह अति आवाज आणि गर्दीमुळे रक्तदाब वाढून चक्कर येणे असे प्रकार आढळून आले.

विघ्नहर्ता न्यासतर्फे दरवर्षी गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावर नागरिकांना वेळीच वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी व्यवस्था केली जाते. या वर्षीसुद्धा गणेशभक्तांसाठी आपत्कालीन वैद्यकीय सेवा पुरविण्यात आली. सुसज्ज रुग्णवाहिका आणि आपत्कालीन वैद्यकीय मदत केंद्र यांच्या माध्यमातून ११२ डॉक्टर, वैद्यकीय शाखेचे विद्यार्थी, परिचारिका, स्वयंसेवक यांच्या माध्यमातून ही सेवा पुरविण्यात आली. मुख्य विसर्जन मिरवणूक सुरू होण्याच्या दोन दिवस आधीपासूनच ही सेवा पुरविण्यात येत होती. नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला. काही रुग्णांना जागेवर उपचार करून सोडण्यात आले. तर काही रुग्णांना ताराचंद रुग्णालय, ससून रुग्णालय येथे दाखल करण्यात आले.



### 582 नागरिकांना या सेवेचा लाभ

» पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यासचे विश्वस्त डॉ. मिलिंद भोई यांचे नेतृत्वाखाली डॉ. नंदकिशोर बोरसे, डॉ. शंतनू जगदाळे, डॉ. प्रीती विक्टर, डॉ. नितीन बोरा, सदाशिव कुंदेन, डॉ. सुजाता कोतवाल, डॉ. कुणाल कामठे, अशोक दोरुगडे, तेजल राठोड, दिनेश मुळे, जयशंकर माने , विठ्ठल वरवडे पाटील यांच्यासह ताराचंद रुग्णालय, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, माय माऊली वृद्धाश्रम  या संस्था यामध्ये सहभागी झाल्या होत्या. मुख्य विसर्जन मिरवणूक सुरू होण्याच्या दोन दिवस आधीपासूनच ही सेवा पुरविण्यात येत होती. ५८२ नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला. काही रुग्णांना जागेवर उपचार करून सोडण्यात आले. तर काही रुग्णांना ताराचंद रुग्णालय, ससून रुग्णालय येथे दाखल करण्यात आले.

# यंदा तब्बल साडेपाच हजार मूर्तींचे दान

## पालिकेच्या आवाहनाला नागरिकांचा वाढता प्रतिसाद, गतवर्षीच्या तुलनेत अकराशेहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन प्रशासकीय पातळीवर करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नागरिकांनीही पर्यावरणासाठी पुढाकार घेतला असून, यंदाच्या गणेशोत्सवात यात मोठा बदल दिसून आला. गतवर्षीपेक्षा अकराशेहून अधिक नागरिकांनी मूर्तिदान उपक्रमात सहभाग घेतला. अद्याप ही संख्या केवळ सातव्या दिवशीच्या विसर्जनाची आहे. अनंत चतुर्थीपर्यंत यामध्ये आणखी वाढ होऊ शकणार असून, पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये यंदा हा उपक्रम नवा विक्रम प्रस्थापित करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



पिंपरी-चिंचवड महापालिका ब प्रभाग आणि संस्कार प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य पिंपरी-चिंचवड शहर यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश विसर्जनाच्या सातव्या दिवसाअखेर ५ हजार ३०६ गणेश मूर्ती दान करण्यात आल्या. गेल्या वर्षी ४ हजार १७२ गणेश मूर्ती करण्यात आले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मूर्तिदानास प्रतिसाद वाढला आहे. त्याचप्रमाणे प्रतिष्ठांच्या कार्यकर्त्यांमध्ये देखील वाढ झाली आहे. अनेकांनी या उपक्रमामध्ये स्वयंसेवक काम करण्यासाठी इच्छा व्यक्त केली आहे

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह व महापालिकेचे अन्य प्रशासकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दीड दिवसापासून हा उपक्रम सुरू करण्यात आला. दरम्यान, दरवर्षीपेक्षा यंदा अधिकाधिक पर्यावरणपूरक गणेश उत्सव साजरा करण्याबाबत जनजागृती करण्यात आली होती. जास्तीत जास्त मातीच्या मूर्ती, प्लास्टिक आणि थर्मोकोल टाळावा आणि ध्वनी आणि नदीचे प्रदूषण होऊ नये यासाठी, प्रशासकीय यंत्रणेप्रमाणेच सामाजिक कार्यकर्त्यांनी देखील कंबर कसली होती. हा उत्सव सुरू होण्यापूर्वी शहरातील विविध भागात जनजागृती, पदफेरी या माध्यमातून नागरिकांना आवाहन देखील करण्यात आले होते. दरम्यान, दीड दिवसाच्या विसर्जनाच्या दिवशी सुरुवातच चांगली झाली होती. नागरिकांनी स्वतः या उपक्रमामध्ये येऊन सहकार्य केले. या वेळी साडेपाचशे हून अधिक मूर्ती दान झाले होते. टप्प्याटप्प्यानी ही संख्या वाढून सात दिवसापर्यंत हा आकडा दिवसाला अडीच हजाराच्या पुढे गेला. अशी माहिती या उपक्रमाचे आयोजक आणि संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन गायकवाड यांनी दिली.

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद

» पिंपरी चिंचवड शहरात विविध सामाजिक कार्यकर्त्यांप्रमाणेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी देखील या उपक्रमात सहभाग घेतला आहे. त्यामुळे या उपक्रमात मोठी मदत झाली. त्याचप्रमाणे एनसीसीचे ६० विद्यार्थी देखील यामध्ये सहभागी झाले होते. दीड दिवसाच्या विसर्जनाच्या दिवशी सुरुवातच चांगली झाली होती. नागरिकांनी स्वतः या उपक्रमामध्ये येऊन सहकार्य केले. या वेळी साडेपाचशे हून अधिक मूर्ती दान झाले होते. टप्प्याटप्प्यानी ही संख्या वाढून सात दिवसापर्यंत हा आकडा दिवसाला अडीच हजाराच्या पुढे गेला.

# शहरातील 'या' भागातील आज पाणीपुरवठा विस्कळीत

## महापालिकेच्या क, फ, ई या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या क, फ, ई या क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील पाणीपुरवठा 19 सप्टेंबर 2024 रोजी संध्याकाळी बंद राहणार आहे. तसेच 20 सप्टेंबर रोजीचा पाणीपुरवठा अपुरा व कमीदाबाने होणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी दिली आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या चिखली जलशुद्धीकरण केंद्र आणि तळवडे नदीजल उपसा केंद्र या ठिकाणी विद्युत पुरवठा करणाऱ्या भोसरी RS2 सबस्टेशन येथे दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याने 19 सप्टेंबर रोजीचा वीजपुरवठा सकाळी 10 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत बंद राहणार आहे. त्यामुळे क फ आणि ई या क्षेत्रीय कार्यालयातील पाणीपुरवठा सकाळी नियमित वेळेत होणार असून संध्याकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

तसेच दुसऱ्या दिवशीचा पाणीपुरवठा अपुरा व कमी दाबाने होणार आहे. तरी सर्व नागरिकांनी महापालिकेकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून काटकसरीने पाण्याचा वापर करावा, आणि महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी महापालिकेकडील उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करुन काटकसरीने पाण्याचा वापर करावा, असे आवाहन कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच 20 सप्टेंबर रोजीचा पाणीपुरवठा अपुरा व कमीदाबाने होणार असल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी दिली आहे

# अनपेक्षितपणे नोटिसा मिळाल्याने अभियंत्यांमध्ये खळबळ...

## कामांची जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

निकृष्ट कामे करणाऱ्या ११ ठेकेदारांना महापालिकेने काळ्या यादीत टाकले असतानाच त्या पाठोपाठ त्या कामांची जबाबदारी असणाऱ्या अधिकाऱ्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्याबाबत महापालिकेच्या २५ उप व कनिष्ठ अभियंत्यांना कारणे दाखवा नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत. अनपेक्षितपणे या नोटिसा मिळाल्याने अभियंत्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. महापालिकेच्या स्थापत्य विभागातील रस्ते दुरुस्ती, ब्लॉक, पदपथ करणे, मातीचे जॉगिंग ट्रॅक बनविणे, उद्यानातील दुरुस्ती करणे यासारखी कामे घेताना ११ ठेकेदारांनी १४ वेगवेगळ्या कामात तब्बल ४५ टके कमी दराने निविदा भरल्या होत्या. इतक्या कमी दरात कामे घेतल्यानंतर त्याचा दर्जा, गुणवत्ता राहिला नाही. ती कामे कमी आणि निकृष्ट दर्जाची केली गेली असल्याचेही आयुक्तांच्या निदर्शनास आले होते. आयुक्त शेखर सिंह यांनी त्या ११ ठेकेदारांच्या १४ कामांचा दर्जा तपासून घेण्यास दक्षता विभागास सांगितले. दक्षता विभागाने पुण्यातील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगकडून कामांच्या दर्जाची तपासणी करून घेतली. सीओईपीने केलेल्या तपासणीत काम निकृष्ट दर्जाचे तसेच, केले नसल्याचे आढळून आले. त्यामुळे दर्जाहीन काम करणाऱ्या दोषी ११ ठेकेदारांना एका वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. ठेकेदारांकडून निकृष्ट झालेल्या कामाचा दुप्पट खर्च वसूल करण्यात येणार आहे. त्या ११ ठेकेदार निकृष्ट कामे करत असतानाही डोळे झाकून काम पाहणाऱ्या सुमारे २५ उपअभियंता व कनिष्ठ अभियंत्यांना शहर अभियंत्यांनी नोटीस बजावली आहे. त्यांच्याकडून खुलासा मागविला आहे. संबंधित अधिकाऱ्यांचा खुलासा आल्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. महापालिकेची विकासकामे निकृष्ट होत असतानात्याकडेदुर्लक्ष करणाऱ्या संबंधित २५ उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंत्यांना नोटीस बजावून खुलासा मागविला आहे. त्यानंतर आयुक्तांशी चर्चा करून कारवाई केली जाईल, असे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.



# महापालिका हद्दीत शेकडो रुग्ण सापडत असताना राज्याच्या आरोग्य विभागाची बनवाबनवी

## पुणे महापालिकेच्या पंधरा क्षेत्रीय कार्यालयात दर दिवशी शेकडो चिकुनगुनिया, डेंगी आणि हिवतापाचे रुग्ण आढळत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात चिकुनगुनियाचा उद्रेक झाला आहे. पुणे महापालिकेच्या पंधरा क्षेत्रीय कार्यालयात दर दिवशी शेकडो चिकुनगुनिया, डेंगी आणि हिवतापाचे रुग्ण आढळत आहेत. असे असताना पुण्यामध्ये मागील तीन महिन्यांत केवळ १५१ रुग्ण आढळल्याचे राज्याच्या साथरोग विभागाचे म्हणणे आहे.

पुणे शहरात दररोज प्रमाणात रुग्ण आढळत आहेत. पुण्यासह राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात साथरोगाचा उद्रेक असताना आरोग्य विभाग सत्ताधाऱ्यांना खुश करण्यासाठी साथीच्या रोगांची खरी माहिती लपवत असल्याचे या निमित्ताने समोर आले आहे.

राज्याच्या आरोग्य विभागाच्या हिवताप, हत्तीरोग आणि जलजन्यरोग विभागाने पुणे शहरात चिकुनगुनियाचे केवळ १५१ रुग्ण असल्याचा अहवाल प्रसिध्द केला आहे. प्रत्यक्षात पुणे शहरातील सर्व नामांकित खासगी रुग्णालय, ससून, पुणे महापालिकेच्या कमला नेहरू, राजीव गांधी रुग्णालयासह शहरातील तीसपेक्षा अधिक दवाखान्यात दररोज शेकडो रुग्ण साथीच्या आजारामुळे तपासणीसाठी तर अनेकजण उपचारासाठी दाखल होत आहेत. तर असंख्य रुग्णांनी उपचारही घेतले आहेत. अनेकजण साथरोगाच्या साइड इफेक्टमुळे हैराण आहेत.

अशा अवस्थेत राज्याचा आरोग्य विभाग पुण्यात चिकुनगुनियाचे केवळ १५१ रुग्ण असल्याचा अहवाल देऊन प्रशासनाची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.



### एकाच सोसायटीत सात जणांना डेंगीची लागण

» येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील गेल्या महिन्यात एकाच सोसायटीत सातजणांना डेंगीची लागण झाली होती. मात्र या ठिकाणी ना धूर फवारणी करण्यात आली, ना अळीनाशक औषधांची फवारणी. या सोसायटीत सात जणांना डेंगी झाल्याची माहिती क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचा-यांना समजली. याच क्षेत्रीय कार्यालयात झिकाचे दोन रुग्ण सापडले होते. मात्र प्रभावीपणे औषध फवारणी आणि परिसरातील गरोदर मातांचे सर्वेक्षण करण्यात आले नाही. झिका हा परिणाम गरोदर मातेच्या पोटातील बाळाच्या मेंदूवर परिणाम करतो. त्यामुळे जन्मलेले बाळ विकलांग होऊ शकते. मात्र याचे गांभीर्य महापालिकेच्या प्रशासकांना असल्याचे दिसून येत नाही. पोटातील बाळाच्या मेंदूवर परिणाम करतो. त्यामुळे जन्मलेले बाळ विकलांग होऊ शकते. मात्र याचे गांभीर्य महापालिकेच्या प्रशासकांना असल्याचे दिसून येत नाही.

### साथरोग नियंत्रणासाठी केंद्र आणि राज्याचा निधी नाही

» राष्ट्रीय कीटकजन्य रोग (हिवताप, डेंगी, चिकुनगुनिया, चंडीपुरा, हत्तीरोग) प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी डास, अळी, डास घनता नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने ग्रामीण आणि शहरी भागात घरोघरी कीटकनाशक फवारणी केली जाते. राज्यात निवडक महापालिका, नगरपालिका हद्दीत केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध प्रकारच्या कीटकनाशक तसेच अळीनाशकांचा पुरवठा केला जातो. मात्र नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड महापालिकांना कीटक रोग नियंत्रणासाठी त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद करावी लागते. त्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून निधी मिळत नाही.

### पुण्यात कीटकनाशक फवारणीचा अभाव

» पुणे महापालिकेच्या पंधरा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत एखादा डेंगी, हिवताप अथवा चिकुनगुनियाचा किंवा झिकाचा रुग्ण आढळल्यास अडीच चौरस किलोमीटर परिसरात एक पर्यवेक्षक आणि दोन कर्मचारी आवश्यक आहे. मात्र पुरेसे मनुष्यबळ आणि पायाभूत सोईसुविधांच्या अभावामुळे कीटकनाशक आणि अळीनाशक फवारणी केली जात नाही.

# औद्योगिक महामार्ग रद्दची लवकरच अधिसूचना

## सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांची संघर्ष समितीच्या शिष्टमंडळास माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्ग रद्द करण्याच्या अधिसुचनेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सही झाली असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहीसाठी ठेवण्यात आले आहे, अशी माहिती सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळास दिली.

पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्ग संघर्ष समितीच्या वतीने औद्योगिक द्रुतगती कायमस्वरूपी रद्द करावा व रद्द झाल्याची अधिसूचना राज्य सरकारने काढावी. या मागणीसाठी बाधित शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलन पुकारले होते.

बाधित शेतकऱ्यांचा विरोध लक्षात घेता राज्य सरकारच्या वतीने महामार्ग रद्द व्हावा, या मागणी साठी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेण्यासाठी मंचर (ता.आंबेगाव) येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने चर्चा केली.

यावेळी शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख बाळासाहेब औटी,समन्वयक वल्लभ शेळके, जी. के. औटी,एम. डी घंगाळे, मोहन नायकोडी, प्रतिक जावळे, काठापूरचे सरपंच अशोक करंडे, माजी उपसरपंच विशाल करंडे, कान्हु करंडे,संपर्क प्रमुख दिलीप जाधव, सुरेश बोरचटे, निवृत्ती करंडे, हेमंत करंडे, अविनाश हाडवळे, गोविंद हाडवळे उपस्थित होते.

पुणे-नाशिक औद्योगिक महामार्ग बाबत मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्ग नाराज आहे. बागायती क्षेत्रातून महामार्ग जात असल्याने, मोठ्या प्रमाणात आंदोलन उभे राहिले आहे. त्यामुळे राजुरी या ठिकाणी उपोषण करण्यात आले.

महामार्गामुळे मोठ्या प्रमाणावर बाधित शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. सध्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग असताना व नवीन महामार्गाची काही आवश्यकता नसताना हा महामार्ग आखण्यात आला आहे. परंतु सध्याच्या महामार्गाचे विस्तारीकरण करण्यात यावे व समांतर रस्ता करण्यात येऊ नये.

त्याचप्रमाणे 2013 च्या केंद्र सरकारच्या भुसंपादण कायद्याची जशीच्या तशी अंमलबजावणी करावी, आदी मागण्यांच्या संदर्भात राज्य सरकारने तोडगा न काढल्यास बाधित शेतकऱ्यांच्या वतीने बाधित गावांमध्ये, तहसील कचेरी, तालुक्याचे लोकप्रतिनिधी,

संबंधित मंत्री यांच्या कार्यालय व घरांपुढे सविनय पद्धतीने आंदोलन,उपोषण, मुंबई मंत्रालय येथे बाधित शेतकऱ्यांचा मोर्चा,आधी उग्र आंदोलन करण्यात येईल,असा इशारा देण्यात आला होता.



### आंदोलन तात्पुरते स्थगित

» परंतु सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनामुळे हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. पुढील आठ दिवसात राज्य सरकारची अधिसूचना निघाली नाही तर आंदोलन अधिक तीव्रतेने पुढे नेले जाईल, असा इशारा शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख बाळासाहेब औटी यांनी दिला.